कोल्हापूर महानगरपालिका
राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

# अटी/शर्ती

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सावित्रीबाई फुले हॉस्पिटल मधील विशेष नवजात काळजी कक्ष SNCU व पंचगंगा हॉस्पिटल करीता वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ पदभरती जाहिरात सन २०२५-२६**

कोल्हापूर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत पंचगंगा हॉस्पिटल करीता भुलतज्ञ व सावित्रीबाई फुले हॉस्पिटलकरीता विशेष नवजात काळजी कक्ष SNCU विभागाकरीता २ वैद्यकीय अधिकारी पदे करार तत्वावर भरणेकरीता प्रत्येक सोमवारी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारणत येणार असून त्याच दिवशी दुपारी ३ वाजता थेट मुलाखत घेऊन उमेदवारांची नियुक्ती करणेत येणार आहे. त्याअनुषंगाने खालील तक्त्यात नमूद केलेल्या रिक्त पद भरतीकरीता इच्छुक व शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनी प्रत्येक सोमवारी (सुट्टीचा दिवस वगळून) सकाळी १० ते १२ या कालावधीमध्ये विहीत नमून्यात अर्ज व आवश्यक त्या सर्व साक्षांकित कागदपत्रासह आरसीएच ऑफिस दुसरा मजला पंचगंगा हॉस्पिटल इमारत शुक्रवार पेठ कोल्हापूर येथे अर्ज सादर करणेत यावे.

| अ क्र | पदाचे नांव | शासन मान्यताप्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन | एकूण भरावयाची पदे | जातीचा प्रवर्ग पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ | MBBS & MD Anesthesia /DA/DNB in Anesthesia | ७५००० | १ | इमाव |
| २ | वैद्यकीय अधिकारी | MBBS, MMC Reg. essential | ६०००० | २ | अजा-१, अज-१ |

**महत्वाच्या सुचना-**

१. सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणसंबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी यांना उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे एकत्रीत मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३. निवड झालेले उमेदवारांना दिनांक २९/६/२०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडून राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरु ठेवणेस व पदांना मंजूरी मिळालेनंतर तसेच मागील कालावधीतील काम समाधान असलेसच पुढील १ वर्ष कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल.

४. पदांची संख्या, शैक्षणिक आर्हता, मानधन, वयोमर्यादा तसेच अटी व शर्तीमध्ये गरजेप्रमाणे बदल करणेची शक्यता आहे. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

५. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टँप पेपरवर लिहून नोटरी करुन घ्यावा लागेल. करारपत्राचे अधिन नियुक्ती असेल.

६. वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ यांची सेवा समाप्तीची वयोमर्यादा ७० वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्ट्या सक्षम असलेचे प्रमाणपत्र अर्जासोबत व कागदपत्र पडताळणीचेवेळी सादर करणे बंधनकारक राहील तसेच पुढील प्रत्येक पुनर्नियुक्तीचे वेळी सदर प्रमाणपत्र सादर करावी लागेल.



Scanned with OKEN Scanner

७. शासन सेवेतून सेवा निवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.

८. मा.सहसंचालकसो (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे दिनांक १५/२/२०१६ रोजीचे परिपत्रकाप्रमाणे शासन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना मानधन देय राहील.

९. पात्र उमेदवार यांचे वर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. आर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

११. वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ या पदाकरीता दर सोमवारी थेट मुलाखत घेऊन भरती करणेत येणार आहे. या पदाचे अर्ज सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत आरसीएच ऑफिस दुसरा मजला पंचगंगा हॉस्पिटल इमारत शुक्रवार पेठ कोल्हापूर येथे स्वीकरणेत येतील तसेच त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मुलाखत घेऊन राबविणेत येईल. मुलाखतीचे वेळी मुळ प्रतीसह उपस्थित राहणेचे आहे. यामध्ये काही बदल झालेस महानगरपालिकेच्या (https://web.kolhapurcorporation.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेत येईल.

१२. वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित राहणेचे आहे.

१३. वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ उमेदवारांनी या पदाकरीता अर्ज करणेपूर्वी उमदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१४. ज्या पदासाठी उमेदवारांनी अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली आर्हता अर्ज करतेवेळेस उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१५. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहिरात दिनांकास साक्षेप समजणेत येईल.

१६. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी चुकिची माहिती सादर केलेचे, कोणतीही माहिती दडवून ठेवलेचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केलेचे आढळून आलेस कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी, नियुक्ती पूर्वसुचना न देता रद्द करणेत येईल तसेच आवश्यक असलेस प्रशासकीय व फौजदारी कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापपत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१८. अर्जदारांनी त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

१९. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या विहीत नमूत्यात संगणकीकृत अर्ज व आवश्यक सर्व कागदपत्राची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात त्यामध्ये शैक्षणिक आर्हतेबाबतची कागदपत्रे, कौंसिलिंगकडे नुतनीकरण, जन्मदाखला, अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र तसेच इतर अनुषंगिक कागदपत्र, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

२०. पात्रता अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे चुकिची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील याबाबत कोणतेही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

12..6.24

आरोग्याधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

## - अर्जाचा नमुना -

| अर्जाचा नोंदणी क्रमांक : |
|---|

ओळखपत्र आकाराचे छायाचित्र

प्रति,
मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

विषय :- -------------------------- पदासाठी अर्ज.

| | |
|---|---|
| संपूर्ण नांव | : |
| वडिलांचे संपूर्ण नांव | |
| पत्ता | : |
| लिंग | : |
| जन्म दिनांक | : / / |
| विवाहीत/अविवाहीत | : |
| जाहिरात दिनांकास वय | : वर्षे - महिने - दिवस — |
| ई-मेल आयडी | : मोबाईल नंबर:- |
| जातीचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| | जातीचा प्रवर्ग |
| | जातीचे नांव |
| अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग | |

| अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल) | विद्यापीठाचे / परिक्षा मंडळाचे | उत्तीर्ण होण्याचे | घेतलेले विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अ) | | | | |
| ब) | | | | |
| क) | | | | |
| ड) | | | | |

सदर पदाचा पुर्वानुभव आहे काय ? (असल्यास खालील रकान्यात तपशील द्यावा) होय/नाही

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव व पुर्ण पत्ता | धारण केलेले पद | कार्यालय/संस्था शासकीय आहे काय | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी पासून - पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |



Scanned with OKEN Scanner

अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रावरती पृष्ठ क्र.सादर करावा.)

| अ.क्र. | | अ.क्र. | |
|---|---|---|---|
| १ | | २ | |
| ३ | | ४ | |
| ५ | | ६ | |
| ७ | | ८ | |
| ९ | | १० | |
| ११ | | १२ | |

## - उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र -

मी असे प्रमाणित करतो/करते की, या अर्जात दिलेली माहिती खरी आहे, त्यापृष्ट्यर्थ मी मुलाखतीचेवेळी प्रमाणपत्राच्या मुळप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस/नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिका-याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील आणि त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :- ................................ अर्जदाराची स्वाक्षरी :-

..............................................................

दिनांक :- ................................ नांव:- ..........................................................

## लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/कुमारी -------------------------------------------------------------------------------------

श्री. -------------------------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय -- ---------------- वर्ष राहणार ---------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१.मी ------------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२.आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक १) / / २) / / )

३.दिनांक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३, जुलै २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकीय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- ---------------- अर्जदाराची स्वाक्षरी: ---------------------------------

दिनांक / /२०२-- अर्जदाराचे नाव: ---------------------------------



Scanned with OKEN Scanner